# मराठी विकिपीडियावर तुमचे स्वागत असो.

कोणीही घडवू शकेल असा हा मुक्त ज्ञानकोश आहे.

सध्या यात **५७,७६४** लेख आहेत.

**आपणांसी जे जे ठावे, ते इतरांसी सांगावे; शहाणे करोनी सोडावे, सकलजन.**

**वाचा**

सर्व पाने सदरे | मुखपृष्ठ | उदयोन्मुख सदरे | विकिप्रकल्प | मोबाईल ?

**लिहा**

कसे लिहू | काय लिहू | इतर काय लिहीताहेत

**घडवा**

चावडीवर चर्चा करा | पुढचे मुखपृष्ठ सदर निवडा | विविध प्रस्तावांवर कौल द्या

विशेष लेखन | क्रीडा | वैद्यकशास्त्र | वनस्पती | तत्त्वज्ञान | इतिहास | भूगोल | सूर्यमाला | महाराष्ट्र शासन | दालन सूची

## विशेष लेख



**कोहिमाची लढाई** दुसऱ्या महायुद्धादरम्यान जपानी सैन्य, आझाद हिंद फौज व दोस्त राष्ट्रांच्या सैन्यांमध्ये लढली गेली होती. एप्रिल ४ ते जून २२, इ.स. १९४४ दरम्यान आधुनिक भारताच्या नागालँड राज्यातील कोहिमा शहराच्या सीमेवर लढली गेलेली ही लढाई जपानच्या उ गो मोहिमेचा सर्वोच्चबिंदू होता. या लढाईची तुलना अनेकदा स्टालिनग्राडच्या वेढ्याशी करण्यात येते.

तीन टप्प्यांत लढल्या गेलेल्या या लढाईच्या सुरुवातीस एप्रिलच्या पूर्वार्धात जपानने कोहिमा रिज ही जागा जिंकून इंफाळकडे जाणारा रस्ता ताब्यात घेतला. १६-एप्रिल १८च्या दरम्यान ब्रिटिश व भारतीय सैन्यांची कुमक आडवाटेने कोहिमाला पोचली व त्यांनी जपान्यांचा प्रतिकार करण्यास सुरुवात केली. या प्रतिहल्ल्यानंतर जपानी सैन्याने कोहिमा रिज सोडली पण कोहिमा-इंफाळ रस्ता त्यांच्याच ताब्यात राहिला. मेच्या मध्यापासून जून २२ पर्यंत ब्रिटिश आणि भारतीय सैन्याने हळूहळू माघार घेणाऱ्या जपानी सैन्याला मागे रेटत रस्ता काबीज केला. तिकडून इंफाळकडूनही चालून आलेल्या दोस्त सैन्याशी त्यांनी मैल दगड १०९ येथे संधान बांधले व इंफाळला पडलेला वेढा मोडून काढला.

इ.स. १९४४च्या सुरुवातीस युनायटेड किंग्डमने भारतातून म्यानमार (तेव्हाचा *ब्रह्मदेश*) आणि तेथून आग्नेय आशियामध्ये ठाण मांडून बसलेल्या जपान्यांना हुसकावण्यासाठीची तयारी सुरू केली होती. यासाठी त्यांनी ईशान्य भारतातील मिझोरम प्रदेशातील इंफाळ शहरात आपले इंडियन फोर्थ कोअर हे सैन्यदल जमवले होते. याला काटशह देण्यासाठी जपानने उ-गो मोहीम या नावाखाली प्रतिआक्रमण करण्याचे ठरवले. जपानच्या पंधराव्या सैन्यदलाच्या मुख्याधिकारी लेफ्टनंट जनरल रेन्या मुतागुची याने या मोहिमेला अधिक मोठे करण्याचे ठरवले. मुतागुचीच्या आराखड्याप्रमाणे जपानी सैन्य फक्त चौथ्या कोअरला अडवण्यासाठी नाही तर ब्रिटिश भारतावर आक्रमण करण्यासाठीच चालून जाणार होते. यात ईशान्य भारतातून घुसून थेट भारताच्या मध्यापर्यंत धडक मारण्याची महत्त्वाकांक्षी योजनाही होते. दीड-दोनशे वर्षे भारतात ठाण मांडलेल्या ब्रिटिशांना असे सहजासहजी हुसकावणे शक्य नाही हा विरोधी युक्तिवाद त्याने नाकारला. प्रकरण युद्धमंत्री हिदेकी तोजोपर्यंत गेल्यावर तोजोनेही हा युक्तिवाद फेटाळून लावला व मुतागुचीला भारतावर आक्रमण करण्यास मुभा दिली.

मुतागुचीच्या व्यूहरचनेनुसार जपानच्या ३१वी डिव्हिजनने कोहिमावर हल्ला करून इंफाळला ब्रिटिश भारतापासून तोडायचे आणि मग खुद्द इंफाळवर हल्ला करीत चौथ्या कोअरला नेस्तनाबूद करीत भारतात घुसायचे ही योजना होती. ५८वी, १२४वी, १३८वी रेजिमेंट आणि ३१वा डोंगरी तोफखाना इतकी शिबंदी घेऊन ३१व्या डिव्हिजनने कोहिमा घेतल्यावर पुढे दिमापूरवर चाल करून जाणे अपेक्षित होते. दिमापूर हातात आल्यास तेथील लोहमार्ग आणि ब्रह्मपुत्रा खोऱ्यावर ताबा मिळवणे व ब्रिटिशांची रसद तोडणे हा डाव त्यात होता.

३१व्या डिव्हिजनचा मुख्याधिकारी लेफ्टनंट जनरल कोतोकू सातो या व्यूहरचनेवर नाखूष होता. या हल्ल्याच्या योजनेत त्याला सुरुवातीपासून सामील केले गेलेले नव्हते आणि त्याच्या मते जपानी सैन्याला कोहिमा पटकन जिंकणे सोपे नव्हते. आपल्या मुख्य सैन्यापासून इतक्या लांबवर चाल करून जाण्यात रसदपुरवठा कायम ठेवणे हे जिकिरीचे काम होते. सातोने आपल्या सहकाऱ्यांजवळ जपानी सैन्याची उपासमार होणार असे भाकीत वर्तवले होते. इतर सेनाधिकाऱ्यांप्रमाणे सातोच्या मते मुतागुचीही रेम्या डोक्याचा होता.

## आपण नवीन सदस्य आहात?

## दिनविशेष

**जुलै २१: बेल्जियमचा राष्ट्रीय दिवस**



- इ.स.पू. ३६६ - जगातील सात आश्चर्यांपैकी एक असलेले इफेसूस येथील आर्टेमिसचे मंदिर आगीत जळून नष्ट.
- १८३१ - लिओपोल्ड पहिला (चित्रात) स्वतंत्र बेल्जियम देशाचा पहिला राजा बनला.
- १९६० - सिरिमावो भंडारनायके सिलोनची पंतप्रधान व जगातील पहिली महिला सरकारप्रमुख बनली.
- १९६९ - अपोलो ११चे अंतराळयात्री नील आर्मस्ट्राँग व बझ आल्ड्रिन चंद्रावर पाऊल ठेवणारे पहिले मानव ठरले.

जन्म:

- १६९३ - थॉमस पेल्हाम-होल्स, ब्रिटनचा तिसरा पंतप्रधान.
- १८९९ - अर्नेस्ट हेमिंग्वे, अमेरिकन लेखक व साहित्यातील नोबेल पारितोषिक विजेता.
- १९३० - आनंद बक्षी, भारतीय गीतकार.

मृत्यू:


- १७९६ - रॉबर्ट बर्न्स, स्कॉटिश कवी.
- २००१ - शिवाजी गणेशन, प्रसिद्ध भारतीय अभिनेता.

जुलै २० - जुलै १९ - जुलै १८

संग्रह

**अलीकडील मृत्यू**:रत्नाकर मतकरी, जॉर्ज फर्नांडिस, रमेश भाटकर, मनोहर पर्रीकर, गिरीश कर्नाड, ली आयाकोका, सुषमा स्वराज, रॉबर्ट मुगाबे, राम जेठमलानी, गिरिजा कीर, टी.एन. शेषन, श्रीराम लागू, बापू नाडकर्णी

## उदयोन्मुख लेख




**२०२० मधील महाराष्ट्रातील कोरोना विषाणू उद्रेक** ९ मार्च २०२० रोजी सुरू झाला. या दिवशी भारताच्या महाराष्ट्र राज्यात कोरोना व्हायरस (साथीचा रोग) च्या साथीच्या आजाराची पहिली नोंद झाली. राज्यात ४ एप्रिल २०२० पर्यंत ६३५ जणांना याची लागण झाली असून त्यापैकी ३२ जणांचा मृत्यू झाला आहे आणि ५२ जण पूर्ण बरे झालेले आहेत.

या उद्रेकामुळे महाराष्ट्रातील जनजीवनावर मोठा परिणाम झालेला आहे. भारतभर लागू झालेल्या नियमानुसार अत्यावश्यक कामाशिवाय सर्वांना घरी बसणे आवश्यक आहे. पर्यटनावर याचा मोठा परिणाम झालेला असून अजिंठा,

१९३०च्या दशकात जपानी सैन्यात पडलेल्या फुटीदरम्यान सातो आणि मुतागुची परस्परविरुद्ध उभे राहिलेले होते आणि त्यामुळ सातोला मुतागुचीवर किंवा त्याच्या डावपेचांवर विश्वास नव्हता.

मार्च १५, इ.स. १९४४ रोजी जपानच्या ३१व्या डिव्हीजनने होमालिन गावाजवळ चिंदविन नदी ओलांडली व भारतावरील आक्रमणाला सुरुवात केली. अंदाजे शंभर किमी (६०मैल) रुंदीची आघाडी सांभाळत हे सैन्य म्यानमारच्या घनदाट जंगलातून वाटचाल करू लागले. डोंगराळ प्रदेश, नद्या-नाले व गर्द झाडी असलेल्या अवघड वाटेवरही जपानी सैन्य जोमाने कूच करीत होते. डाव्या आघाडीवरील ५८वी रेजिमेंट इतरांच्या पुढे होती. त्यांची गाठ ब्रिटिश भारतीय सैन्याची सर्वप्रथम इंफाळच्या उत्तरेस मार्च २०च्या सुमारास पडली.

**पुढे वाचा...**

**मागील अंक**: जून २०१९ - एप्रिल २०१९ - मार्च २०१९ - जानेवारी २०१९ - नोव्हेंबर २०१८ - मे २०१८ - मार्च २०१८ - महिला दिवस, २०१८ - २०१७ मधील सदर लेख - २०१६ मधील सदर लेख - २०१५ मधील सदर लेख - २०१४ मधील सदर लेख- २०१२ मधील सदर लेख - २०१२ मधील सदर लेख - २०११ मधील सदर लेख - २०१० मधील सदर लेख - २००९ मधील सदर लेख - २००८ मधील सदर लेख - मागील अंक

मोबाईल ?

**मागील अंक पाहा ·आगामी सदर निवडा**

## आजचे छायाचित्र



## थोडक्यात 'विकिपीडिया' प्रकल्पाविषयी

| | |
|---|---|
| विकिपीडिया मदत मुख्यालय | विकिपीडिया संपादन मदत |
| विकिपीडिया:मदतकेंद्र | विकिपीडिया-परिचय |
| आवाहन | पारिभाषिक संज्ञा |
| निर्वाह | नेहमी विचारले जाणारे प्रश्न |
| विकिपीडिया चावडी | विकिपीडिया प्रकल्प |

**पृष्ठे ·सहाय्य ·सांख्यिकी ·वर्ग**

वेरुळ, घारापुरी लेणी, गेटवे ऑफ इंडिया यांसह राज्यभरातील पर्यटनस्थळांवरील गर्दी नाहीशी झाली आहे. हॉटेल, भाड्याच्या गाड्यांचे गिऱ्हाईकांनी आपल्या यात्रा बव्हंश रद्द केल्या आहे.

रुग्णांची संख्या वाढू लागल्यावर राज्य सरकारने अनेक धार्मिक स्थळेही बंद करण्याचा निर्णय घेतला. यात मुंबईतील सिद्धिविनायक, मुंबादेवी, उस्मानाबाद जिल्ह्यातील तुळजाभवानीचे मंदिर, पुण्यातील दगडूशेट हलवाई गणपती, शिर्डीतील साईबाबा मंदिर यांसह अनेक मोठ्या यात्रास्थळांचा समावेश आहे.

राज्यातील ५० टक्के पेक्षा जास्त रुग्ण मुंबई महानगर भागातून (एमएमआर) आढळून आलेले आहेत. एमएमआर- पुणे जिल्ह्याचा पट्टा हा देशातील कोरोनाव्हायरस प्रादुर्भावासाठी एक 'हॉटस्पॉट' बनला आहे.

महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाने ११ मार्चपासून अंदाजे २०,००० बसफेऱ्या रद्द केल्या तर भारतीय रेल्वेने महाराष्ट्रातून निघणाऱ्या २३ गाड्या रद्द केल्या. याशिवाय मुंबई उपनगरी रेल्वेच्या सगळ्या फेऱ्या २२ मार्च ते ३१ मार्च पर्यंत बंद ठेवण्यात आल्या. यात मुंबई मेट्रोचाही समावेश होता. २२ मार्च होजी राज्य सरकारच्या आणि खाजगी सगळ्या बस सेवा अनिश्चित काळासाठी बंद करण्यात आल्या. तेलंगणा सरकारने महाराष्ट्रातून तेलंगणामध्ये जाणाऱ्या लोकांच्या वैद्यकीय चाचण्या करण्यासाठी सीमेवर चार केंद्रे उभारली आहेत.

*कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी लोकांनी घराबाहेर पडू नये, दोन व्यक्तींमध्ये सुरक्षित अंतर ठेवावे* असे स्पष्ट निर्देश प्रशासनाने वारंवार करुनही लोक गंभीरतेने घेताना दिसले नाहीत. जीवनावश्यक वस्तूंच्या खरेदीसाठी जनतेला दिलेली सूट हीच लोकांच्या बेशिस्तीच्या वागण्याने समाजासाठी प्राणघातक ठरु नये या साठी पोलिस यंत्रणा यंत्रणा झटत आहे. वैद्यकीय यंत्रणा जीवावर उदार होऊन रात्रंदिवस सेवा करण्यात व्यस्त आहे. मूलभूत अधिकारांसोबत नागरिकांनी आपल्या मूलभूत कर्तव्यांबाबतही जागरूक असायला हवं असे मत मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न वरळे व्यक्त केले.

**(पुढे वाचा...)**

**मागील अंक पाहा ·आगामी सदर निवडा**

## आणि हे आपणास माहीत आहे का?

- ...की, मराठी २६ जानेवारी, २०२० रोजी मराठी विकिपीडियावर एकूण ८,०२३ चरित्रलेख होते. यांपैकी २,३२६ म्हणजेच २८% लेख स्त्री चरित्रलेख तर उर्वरित पुरुष चरित्रलेख होते? इंग्लिश विकिपीडियावर हे प्रमाण १८% आहे.
- ...की, २८ जानेवारी, १९६८ ते ६ जुलै, १९६९ या दीड वर्षांत बिहारच्या मुख्यमंत्रीपदावर पाच वेळा बदल झाले?
- ...की, बांगलादेश जगातले तिसरे सर्वात मोठे हिंदू राष्ट्र असून तेथील १,२४,९२,४२७ व्यक्ती हिंदू धर्म पाळतात?
- ...की, एरबस ए३४०-५०० प्रकारच्या विमानात प्रवास चालू असताना प्रवासी दगावल्यास मृतदेह ठेवण्यासाठी विशेष कपाट असते?
- ...की इ.स. १९४४ च्या नोव्हेंबरमध्ये पोलंडमधील नाझी राजवटीच्या काळातील ऑश्विझ छळछावणीत विषारी वायूच्या चेंबरमध्ये कोंडून युध्दकैद्यांना ठार करणे थांबवले गेले.



- ...की दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जपानमधील हिरोशिमा आणि नागासाकी या शहरांवर अणुबाँब टाकण्याचा निर्णय अमेरिकेचे ३३ वे राष्ट्राध्यक्ष हॅरी ट्रुमन यांचा होता.
- ...की ३१ डिसेंबर, इ.स. १८०२ रोजी मराठा साम्राज्यातील दुसरा बाजीराव पेशवा आणि ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी यांच्यात झालेल्या वसईच्या तहाने दुसऱ्या इंग्रज-मराठा युद्धाची ठिणगी पडली.



- ...की अशोकाच्या शिलालेखात नमूद केल्याप्रमाणे कलिंगच्या युद्धातील प्रचंड जिवितहानी पाहिल्याने सम्राट अशोक याने परत कधीही युद्ध न करण्याचा निर्णय घेतला.
- ...की नांदेड जिल्ह्याच्या लोहा तालुक्यातील गुराखीगडावर दरवर्षी आगळेवेगळे गुराखी साहित्य संमेलन भरवले जाते.
- ...की, मल्लिका शेरावत ही तत्त्वज्ञानाची विद्यार्थीनी होती.

वरील माहिती मराठी विकिपीडियावर अलीकडे संपादित केलेल्या लेखांतून गोळा केलेली आहे.

मागील अंक

## संक्षिप्त सूची

**समाजशास्त्र**

पुरातत्त्वशास्त्र • मानवशास्त्र • अर्थशास्त्र • शिक्षण • कायदा • समाजशास्त्र • राजकारण • राजनीती विज्ञान

**भूगोल**

भूगोल • खंड • देश • शहरे • पर्वत • समुद्र • पृथ्वी • खगोलशास्त्र • सूर्यमाला

**कला आणि संस्कृती**

नृत्य • संगीत • व्यंगचित्र • काव्य • शिल्पकला • नाटक •

विश्वास

श्रद्धा • धर्म • हिंदू धर्म • इस्लाम धर्म • ख्रिश्चन धर्म • रोमन धर्म • बौद्ध धर्म • जैन धर्म • ज्यू धर्म • संस्कृतीनुसार दैवते •

• पराश्रद्धा • फलज्योतिष •

• अश्रद्धा • नास्तिकता

**अभियांत्रिकी**

तंत्रज्ञान • जैवतंत्रज्ञान • अतिसूक्ष्मतंत्रज्ञान • अभियांत्रिकी • रासायनिक अभियांत्रिकी • विमान अभियांत्रिकी • अंतरीक्ष अभियांत्रिकी • संगणक • संगणक अभियांत्रिकी • स्थापत्य अभियांत्रिकी • विद्युत अभियांत्रिकी • विजाणूशास्त्र • यांत्रिकी

**विज्ञान** आणि **आरोग्य**

विज्ञान • जीवशास्त्र • वनस्पतीशास्त्र • पशु विज्ञान • आयुर्विज्ञान • भौतिकशास्त्र • रसायनशास्त्र • जैवरसायनिकी • गणित • अंकगणित • बीजगणित • भूमिती • कलन • स्वास्थ्यविज्ञान • रोग • चिकित्साशास्त्र • चिकित्सा पद्धती

**भाषा** आणि **साहित्य**

मराठी मराठी

भाषा • भाषा-परिवार • भाषाविज्ञान • मराठी भाषा • साहित्य • काव्य • कथा

**मनोरंजन** आणि **क्रीडा**

क्रीडा • क्रिकेट • फुटबॉल • चित्रकथा • दूरचित्रवाहिनी • पर्यटन • पाककला • इंटरनेट • रेडियो • चित्रपट • बॉलीवूड

**व्यक्ती आणि वल्ली**

व्यक्ती • अभिनेते • अभिनेत्री • खेळाडू • लेखक • शास्त्रज्ञ • संगीतकार • संशोधक • गायक



**इतिहास**

इतिहास • कालमापन • संस्कृती • देशानुसार इतिहास • युद्ध • महायुद्धे • साम्राज्ये

**पर्यावरण**

पर्यावरण • पर्यावरणशास्त्र • हवामान• पश्चिम घाट

## निवेदन

मराठी विकिपीडियाची प्रगती सातत्याने होत आहे. ही गती वाढविण्यासाठी आणि विकिपीडियातील मजकूर अधिक गुणवत्तेचा तसेच परिपूर्ण करण्यासाठी आपला सहयोग अतिमहत्त्वाचा आहे. यासाठी पुढील काही गोष्टी आपण करु शकता:

- "अलीकडील बदल" हे अतिशय लोकप्रिय पान आहे. यापानावरील इतरांकडून होत असलेले बदल तुम्ही तपासून पाहू शकता. एक वाचक म्हणून आपला प्रतिसाद संबधित लेखांच्या चर्चापानावर नोंदवा किंवा लेखाचे स्वतः संपादन करा.
- येथे दिसत असलेले मुखपृष्ठ सदर अनेक विकिपीडियन्स तयार करतात. यासाठी प्रत्येक महिन्याकरता एक विषय निवडला जातो व त्या विषयावरील लेख मासिक सदर म्हणून प्रकाशित केला जातो. येत्या महिन्याच्या मासिक सदरासाठी येथे नामनिर्देशन करा.
- विकिपीडिया प्रकल्प पानांवर उपलब्ध प्रकल्प पाहून आवडीच्या प्रकल्पात सहभाग नोंदवा किंवा नवीन प्रकल्पाची सुरुवात करा.

*वाचक? अभिप्राय हवा !! (अभिप्राय नोंदवण्यास येथे टिचकी मारा)

## इतर भारतीय भाषांमधील विकिपीडीया

**१०,००,०००+** : इंग्लिश

**१,००,०००+** : हिंदी , उर्दू , तमिळ.
**५०,०००+** : तेलुगू, मल्याळम, बंगाली.
**१०,०००+** : नेपाळी, गुजराती, संस्कृत,

कन्नड, पंजाबी, उडिया, सिंधी.

**१,०००+** : संथाली, मैथिली, काश्मिरी.
**संपूर्ण यादी (https://meta.wikimedia.org/wiki/List_of_Wikipedias)**

**विकिपीडियाचे सहप्रकल्प**

विकिपीडिया हा 'विकिमीडिया फाउंडेशन' या विना-नफा तत्त्वावर चालणाऱ्या संस्थेचा प्रकल्प असून या संस्थेद्वारे इतर अनेक विकिपीडियाचे सहप्रकल्प चालवले जातात:

- कॉमन्स – सामायिक भांडार
- विकिस्रोत – स्रोत कागदपत्रे
- विक्शनरी – शब्दकोश
- विकिबुक्स – मुक्त ग्रंथसंपदा
- विकिक्वोट्स – अवतरणे
- विकिन्यूज (इंग्लिश आवृत्ती) – बातम्या
- विकिस्पेशीज (इंग्लिश आवृत्ती) – प्रजातिकोश
- विकिविद्यापीठ (https://beta.wikiversity.org/wiki/Main_Page) – शैक्षणिक मंच
- मेटा-विकि – सुसूत्रीकरण

---

"https://mr.wikipedia.org/w/index.php?title=मुखपृष्ठ&oldid=1654131" पासून हुडकले